# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक/२१८/२०२१

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाचे केंद्रियकरण करण्याबाबत मा. वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेने मान्य केली आहे.

उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विकेंद्रित वित्त विभागाची व्यवस्था निरसित करुन विविध विकेंद्रित वित्त विभागांचे तात्काळ प्रभावाने केंद्रिय वित्त व लेखा विभागात विलीनीकरण करण्यात येत आहे. वित्त व लेखा विभागाची नवीन रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | कक्ष | अ. क्र. | कक्ष |
|---|---|---|---|
| १. | बुक युनिट | २. | अनुदान कक्ष |
| ३. | वेतन व भविषय निर्वाह निधी कक्ष | ४. | अर्थसंकल्प व देणगी कक्ष |
| ५. अ | देयक कक्ष (विद्यापीठ निधी) | ५. ब | देयक कक्ष (अनुदान) |
| ५. क | Payment/Tally/TDS/Reconcilation कक्ष | | |

या नवीन रचनेप्रमाणे होणारे प्रशासकीय तसेच वित्तीय प्रक्रियांमधील बदलांबाबत संबंधितांना स्वतंत्रपणे सूचित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. सदर बदल करीत असताना मा. विभागप्रमुख/ मा. संचालक/मा. समन्वयक इ. यांचे वित्तीय अधिकार अबाधित राहतील. अध्यादेश १५१ प्रमाणे व्हाऊचर पास करण्याचे अधिकार मात्र वित्त व लेखा विभागातील केवळ वर्ग १ अधिकारी यांचकडेच राहतील याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७
**जा.क्र.:** वित्त/२०२१-२२/७६०
**दिनांक :** १८/०८/२०२१

(डॉ. प्रफुल्ल पवार)
**वित्त व लेखा अधिकारी**
(अतिरिक्त कार्यभार)

**प्रत माहितीसाठी :**

१. मा. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७
२. मा. प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७
३. मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७
४. मा. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७
५. मा. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७
६. मा. सर्व केंद्रित/विस्तारित वित्त शाखाप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७